# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/औबाद /५१९ / २०१४ / ४०

तक्रार दाखल दिनांक ;- २६.०८.२०१४
निकाल दिनांक ;- २३.०९.२०१४

श्री. रिजवान अबुकर दाऊद तक्रारदार
प्लॉट नंबर ५७, दिलरस कॉलनी,
औरंगाबाद .

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
शहरी विभाग, औरंगाबाद

गैरअर्जदार क्रमांक १

जी.टी.एल. -

गैरअर्जदार क्रमांक २

मंच सदस्य

डॉ. भास्कर गो.पालवे, अध्यक्ष
श्री. विलासचंद्र . सु. काबरा सदस्य
श्री. एस.एस. गऊळकर सदस्य / सचिव

# *निर्णय*

अर्जदाराने ग्राहक ग्रा-हाणे निवारण मंचासमोर अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनीयम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २६.०८.२०१४ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी, औरंगाबाद तसेच एक प्रत उप-महाव्यवस्थापक ( नियोजन ) मे.जी.टी.एल. औरंगाबाद यांना पाठविण्यात आलेली आहे.अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०९.०९.२०१४ , १६.०९.२०१४ व २३.०९.२०१४ मध्ये ठेवण्यात आली.
ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१ ) अर्जदाराने प्लॉट नंबर २४, २५ अनुसार कॉलनी पडेगांव या ठिकाणी एक ( १ ) रुमचे बांधकाम झालेल्या ठिकाणी नवीन विदयुत जोडणी करुन मागितली आहे. अर्जदारास सदर जागेवर सहकुंटुब राहणेस जावयाचे आहे. मुलाच्या शिक्षणासाठी घरगुती सिंगल फेज कनेक्शन वीज जोडणीची आवश्यकता असल्याचे ग्राहकाचे म्हणणे आहे त्यासाठी ग्राहकाने दिनांक ०८.०३.२०१४ रोजी ए-वन फॉर्म भरुन नवीन जोडणीसाठी अर्ज केला आहे परंतु आजपर्यत कोटेशन देण्यात आलेले नाही. तरी घरगुती सिंगलफेज नवीन वीज जोडणी मिळण्यासंबधी मंचास विनंती केली आहे .

२ ) ग्राहकाने नवीन वीज जोडणी मिळत नसल्यामुळे दिनांक ०५.०६.२०१४ रोजी मे. जी.टी.एल. अंतर्गत तक्रार निवारण मंचाकडे तक्रार केली होती . सदर तक्रारीमध्ये ग्राहकाने खालीलप्रमाणे तपशील दिला आहे.

गैरअर्जदार क्रमांक २ मे. जी.टी.एल. चे अधिकारी सर्वे करण्यासाठी प्लॉटवर आले होते त्यांच्या अहवालानुसार प्लॉट नंबर २४ वर रु. १३,६५०/- थकबाकी आहे व प्लॉट नंबर २५ वर रु. १३,६४४/- थकबाकी आहे व त्यासंबधीची नोटीस दिनांक ०९.०४.२०१४ रोजी देण्यात आली. ग्राहकाने मे. जी.टी.एल लि. कंपनीच्या क्रांती चौक कार्यालयातील अधिका-यांना समजावून सांगीतले की प्लॉट नंबर २४ व २५ हा सह प्लॉट आहे. सदरील प्लॉटवर कोणीही लाईट कनेक्शन घेतलेले नाही यासंबधी स्पष्टीकरण दयावे , ग्राहकाने मीटर तपासला असता तो रुकय्या बेगम इमरान यांच्या नावे असून सध्या लाईव्ह ( चालू ) आहे व त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१२५९६८३६ असा आहे व दुसरा मीटर एस.के. अनवर यांचे नावे असल्याचे

आढळुन आले व त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००११६८२४७८ ( सदरहू मीटर कायमस्वरुपी खंडीत ( पी.डी ) झालेला आहे ) चालू स्थितीत असलेला मीटर हा अर्जदाराच्या जागेत बसविलेला नाही. त्यामुळे दोन्ही मीटरची थकबाकी अर्जदार भरु शकत नसल्याचे म्हटले आहे.

अर्जदाराने सदर जागेच्या खरेदी संबधिची कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत. सदर कागद पत्राचे निरीक्षण केले असता खालील गोष्टीचा उलगडा होतो.

सदरील मिळकत पूर्णपणे दोषमुक्त असुन त्यावर कोणत्याही बॅकेचे, राज्य सरकारचे ( निम सरकारी ) सोसायटीचा अथवा खाजगी कर्ज, दान, चोळी बांगडी गहान, बोजा बक्षीस वगैरे निघाल्यास ते भरण्याची संपूर्ण जबाबदारी ही लिहून देण्या-याची आहे व लिहून देणार त्याची तोषिश लिहून घेणार यांना लागु देणार नाहीत.

३ ) कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, महावितरण, औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक ०९.०९.२०१४ च्या पत्रानुसार आपले म्हणणे मंचासमोर मांडले आहे,शहर विभाग, औरंगाबाद परिमंडळ हे क्षेत्र दिनांक ०१.०५.२०११ पासुन मे. जी.टी.एल लि. कंपनीकडे हंस्तातरीत करण्यात आले आहे. त्यामुळे दि. ०१.०५.२०११ पासुन उपलब्ध कागदपत्रे मे. जी.टी.एल चे म्हणणे व वरील वस्तुस्थिती वर आधारीत माननिय मंचाने निर्णय घ्यावा अशी विनंती केली आहे

४ ) मे.जी.टी.एल लि. औरंगाबाद यांनी त्यांचे दिनांक १६.०९.२०१४ पत्रानुसार याविषयी आपले म्हणणे मंचासमोर मांडले आहे, अर्जदाराने दि. ०८.०३.२०१४ रोजी प्लॉट नंबर २४, २५ गट क्रमांक ७१ अनसार कॉलनी पडेगांव येथे नवीन वीज कनेक्शन मागीतले होते. सदर जागेवर थकबाकी असल्यामुळे नवीन कनेक्शन देण्यात आलेले नाही त्याठिकाणी रुकय्या बेगम शेख इमरान प्लॉट नंबर २४, गट क्रमांक ७१ अनसार कॉलनी, औरंगाबाद ग्राहक नंबर ४९००१२५९६८३६ वर रुपये १८६१७/- ची थकबाकी आहे हे कनेक्शन दिनांक २९ डिसेबंर २०१० रोजी देण्यात आलेले आहे. परंतु सदर कनेक्शन सध्या इतरत्र चालु असल्याचे म्हटले आहे.

ग्राहक क्रमांक ४९००११७५२४७८ हे मीटर शेख अनवर शेख निसार , गट क्रमांक ७१ प्लॉट नंबर २५ अनसार कॉलनी , औरंगाबाद या नावे रु. १३६४४/- एवढी

आहे. सदर कनेक्शन दिनांक २२ जुलै २००६ रोजी देण्यात आले होते हे कनेक्शन दिनांक १५ जानेवारी २०११ रोजी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेले आहे.

मे.जी.टी.एल ली.अंतर्गत तक्रार निवारण मंचाने दिलेल्या निर्णयानुसार ग्राहक नंबर ४९००११७५२४७८ हे कनेक्शन कायमस्वरुपी बंद करण्यात आलेले आहे. सदर ग्राहकाची थकबाकी भरण्याची सुचना ग्राहकास करण्यात आलेली आहे. सदर थकबाकी भरल्याशिवाय अर्जदारास नवीन कनेक्शन देता येणार नाही.

५ ) गैरअर्जदार क्रमांक १, कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) नोडल कार्यालय, औरंगाबाद परिमंडळ महावितरण यांनी दि. २३.०९.२०१४ च्या पत्रानुसार मा.मंचासमोर आपले म्हणणे मांडले आहे

त्यानुसार मे. जी.टी.एल. लि. गैरअर्जदार क्रमांक २ ,यांनी घेतलेली भूमिका महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( इलेक्ट्रीक सप्लाय कोड आणि विदयुत सप्लाय संबधी अटी ) नियमन २००५ आणि विदयुत पुरवठा पुन्हा सुरु करण्याविषयी असलेल्या नियमास धरुन आहे

ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निरीक्षण -

६ ) अर्जदार , गैरअर्जदार क्रमांक १ व गैरअर्जदार क्रमांक २ यांनी सादर केलेली कागदपत्रे, विदयुत कायदा २००३ अंतर्गत कलम क्रमांक ५६ ( २ ) नुसार आणि महाराष्ट्र नियमन आयोग ( विदयुत सप्लाय कोड आणि विदयुत सप्लाय संबधी इतर अटी ) नियमन २००५ मधील कलम क्रमांक १०.५ नुसार नवीन मालकाने त्याजागेवर पूर्वीच्या मालकाने वापरलेल्या वीज बिलाची थकबाकी भरणे आवश्यक आहे. परंतु सदर थकबाकीची रक्कम सहा महिन्याचे वीज बिलाच्या रक्कमेपेक्षा जास्त नसावी.

वरील सर्व बाबीचा विचार करता मंच खालीलप्रमाणे आदेश देत आहे

## **आदेश**

१ ) अर्जदाराने ग्राहक क्रमांक ४९००११७५२४७८ हे मीटर शेख अनवर शेख निसार गट क्रमांक ७१,प्लॉट नं. २५ अनसार कॉलनी, औरंगाबाद या जागेवर असलेल्या वीज बीलाच्या थकबाकीपैकी सहा महिन्याची थकबाकी भरावी

२ ) वरीलप्रमाणे सहा महिन्याच्या वीज बिलाची थकबाकी भरल्यानंतर त्वरीत गैरअर्जदार क्रमांक २ मे. जी.टी.एल. ली. औरंगाबाद यांनी वीज कनेक्शन देण्यात यावे.

३ ) वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल ३० दिवसाचे आत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | विलासचंद्र. सु. काबरा | एस.एस.गऊळकर |
| अध्यक्ष | सदस्य | सदस्य/सचिव |